## राज्यसेवा परीक्षा

**१. संवर्ग व पदे याबाबतचा संक्षिप्त तपशील:-**

**१.१** राज्य शासनाच्या सेवेतील राजपत्रित गट-अ व गट-ब संवर्गातील खालील पदे शासनाच्या मागणीनुसार व पदांच्या उपलब्धतेनुसार सदर परीक्षेमधून भरण्यात येतात:-

| अ.क्र. | पदाचे नाव | वेतन मॅट्रिक्समधील वेतन स्तर | उच्च पदावर बढतीची संधी | नियुक्तीचे ठिकाण |
|---|---|---|---|---|
| १ | उप संचालक/प्रकल्प अधिकारी (एकात्मिक अदिवासी विकास प्रकल्प)(श्रेणी एक) / उपायुक्त, गट-अ | S-२३ : ६७७००-२०८७०० अधिक महागाई भत्ता व नियमाप्रमाणे देय भत्ते. | सह संचालक व त्यापुढील पदे | महाराष्ट्रात कोठेही |
| २ | उप जिल्हाधिकारी, गट - अ | S-२० : ५६१००-१७७५०० अधिक महागाई भत्ता व नियमाप्रमाणे देय भत्ते. | उप जिल्हाधिका-यांच्या निवडश्रेणीत व त्यापुढील पदे | महाराष्ट्रात कोठेही |
| ३ | पोलीस उप अधीक्षक/सहायक पोलीस आयुक्त, गट-अ | S-२० : ५६१००-१७७५०० अधिक महागाई भत्ता व नियमाप्रमाणे देय भत्ते. | पोलीस अधीक्षक / पोलीस उपायुक्त व त्यापुढील पदे | महाराष्ट्रात कोठेही |
| ४ | सहायक राज्यकर आयुक्त,गट-अ | S-२० : ५६१००-१७७५०० अधिक महागाई भत्ता व नियमाप्रमाणे देय भत्ते. | राज्यकर उपायुक्त व त्यापुढील पदे. | महाराष्ट्रात कोठेही |
| ५ | उपनिबंधक, सहकारी संस्था,गट-अ | S-२० : ५६१००-१७७५०० अधिक महागाई भत्ता व नियमाप्रमाणे देय भत्ते. | सहनिबंधक सहकारी संस्था व त्यापुढील पदे | महाराष्ट्रात कोठेही |
| ६ | उप मुख्य कार्यकारी अधिकारी/ गट विकास अधिकारी (उच्च श्रेणी),गट-अ | S-२० : ५६१००-१७७५०० अधिक महागाई भत्ता व नियमाप्रमाणे देय भत्ते. | महाराष्ट्र विकास सेवेतील वरिष्ठ पदावर. | महाराष्ट्रात कोठेही |
| ७ | सहायक संचालक, महाराष्ट्र वित्त व लेखा सेवा, गट-अ | S-२० : ५६१००-१७७५०० अधिक महागाई भत्ता व नियमाप्रमाणे देय भत्ते. | महाराष्ट्र वित्त व लेखा सेवा, गट -अ (वरिष्ठ)व त्यापुढील पदे | महाराष्ट्रात कोठेही |
| ८ | मुख्याधिकारी,नगरपालिका/परिषद, गट-अ | S-२० : ५६१००-१७७५०० अधिक महागाई भत्ता व नियमाप्रमाणे देय भत्ते. | निवड श्रेणीतील पदावर | नगरपालिका/नगर परिषद क्षेत्रात |
| ९ | अधीक्षक, राज्य उत्पादन शुल्क, गट-अ | S-२० : ५६१००-१७७५०० अधिक महागाई भत्ता व नियमाप्रमाणे देय भत्ते. | उपायुक्त (वरिष्ठ) व त्यापुढील पदे | महाराष्ट्रात कोठेही |
| १० | शिक्षणाधिकारी, महाराष्ट्र शिक्षण सेवा, गट-अ (प्रशासन शाखा) | S-२० : ५६१००-१७७५०० अधिक महागाई भत्ता व नियमाप्रमाणे देय भत्ते. | शिक्षण उप संचालक व त्यापुढील पदे | महाराष्ट्रात कोठेही |
| ११ | प्रकल्प अधिकारी (एकात्मिक अदिवासी विकास प्रकल्प)(श्रेणी दोन)/ सहायक आयुक्त, गट-अ | S-२० : ५६१००-१७७५०० अधिक महागाई भत्ता व नियमाप्रमाणे देय भत्ते. | उपसंचालक/प्रकल्प अधिकारी (एकात्मिक अदिवासी विकास प्रकल्प) (श्रेणी एक) / उपायुक्त व त्यापुढील पदे | महाराष्ट्रात कोठेही |
| १२ | उद्योग उप संचालक (तांत्रिक), गट-अ | S-२० : ५६१००-१७७५०० अधिक महागाई भत्ता व नियमाप्रमाणे देय भत्ते. | अधीक्षकीय उद्योग अधिकारी, गट-अ व त्यापुढील पदे | महाराष्ट्रात कोठेही |
| १३ | तहसिलदार, गट — अ | S-१९ : ५५१००-१७५१०० अधिक महागाई भत्ता व नियमाप्रमाणे देय भत्ते. | उपजिल्हाधिकारी व त्यापुढील पदे | महाराष्ट्रात कोठेही |
| १४ | सहायक संचालक, कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता गट-अ | S-१९ : ५५१००-१७५१०० अधिक महागाई भत्ता व नियमाप्रमाणे देय भत्ते. | उप संचालक व त्यापुढील पदे | महाराष्ट्रात कोठेही |
| १५ | उपशिक्षणाधिकारी, महाराष्ट्र शिक्षण सेवा,गट-ब (प्रशासन शाखा) | S-१७ : ४७६००-१५११००अधिक महागाई भत्ता व नियमाप्रमाणे देय भत्ते. | शिक्षणाधिकारी व त्यापुढील पदे | महाराष्ट्रात कोठेही |
| १६ | कक्ष अधिकारी, गट-ब — मंत्रालयीन विभाग | S-१७ : ४७६००-१५११००अधिक महागाई भत्ता व नियमाप्रमाणे देय भत्ते. | अवर सचिव व त्यापुढील पदे | फक्त मुंबई |
| | कक्ष अधिकारी, गट-ब — महाराष्ट्र लोकसेवा आयोग | S-१५ : ४१८००-१३२३०० अधिक महागाई भत्ता व नियमाप्रमाणे देय भत्ते. | | |
| १७ | सहायक प्रादेशिक परिवहन अधिकारी, गट -ब | S-१६ : ४४९००-१४२४०० अधिक महागाई भत्ता व नियमाप्रमाणे देय भत्ते. | उप प्रादेशिक परिवहन अधिकारी,गट-अ व त्यापुढील पदे | महाराष्ट्रात कोठेही |
| १८ | लेखा अधिकारी,महाराष्ट्र वित्त व लेखा सेवा, गट -ब | S-१६ : ४४९००-१४२४०० अधिक महागाई भत्ता व नियमाप्रमाणे देय भत्ते. | महाराष्ट्र वित्त व लेखा सेवा, गट-अ (कनिष्ठ)व त्यापुढील पदे | महाराष्ट्रात कोठेही |
| १९ | सहायक गट विकास अधिकारी, गट —ब | S-१५ : ४१८००-१३२३०० अधिक महागाई भत्ता व नियमाप्रमाणे देय भत्ते. | महाराष्ट्र विकास सेवा, गट -अ व निवडश्रेणीत | महाराष्ट्रात कोठेही |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| २० | मुख्याधिकारी ,नगरपालिका /नगर परिषद,गट- ब | S-१५ : ४१८००-१३२३०० अधिक महागाई भत्ता व नियमाप्रमाणे देय भत्ते. | मुख्याधिकारी नगरपालिका / नगर परिषद,गट -अ व त्यापुढील पदे | नगरपालिका/नगर परिषद क्षेत्रात |
| २१ | सहायक निबंधक सहकारी संस्था, गट-ब | S-१५ : ४१८००-१३२३०० अधिक महागाई भत्ता व नियमाप्रमाणे देय भत्ते. | उपनिबंधक सहकारी संस्था व त्यापुढील पदे | महाराष्ट्रात कोठेही |
| २२ | उप अधीक्षक, भूमि अभिलेख, गट-ब | S-१५ : ४१८००-१३२३०० अधिक महागाई भत्ता व नियमाप्रमाणे देय भत्ते. | जिल्हा अधीक्षक,भूमी अभिलेख,गट -अ व त्यापुढील पदे | महाराष्ट्रात कोठेही |
| २३ | उपअधीक्षक, राज्य उत्पादन शुल्क, गट-ब | S-१५ : ४१८००-१३२३०० अधिक महागाई भत्ता व नियमाप्रमाणे देय भत्ते. | अधीक्षक, राज्य उत्पादन शुल्क, गट-अ व त्यापुढील पदे | महाराष्ट्रात कोठेही |
| २४ | सहायक आयुक्त, राज्य उत्पादन शुल्क, गट-ब | S-१५ : ४१८००-१३२३०० अधिक महागाई भत्ता व नियमाप्रमाणे देय भत्ते. | उपायुक्त (कनिष्ठ) राज्य उत्पादन शुल्क, गट –अ व त्यापुढील पदे | महाराष्ट्रात कोठेही |
| २५ | कौशल्य विकास,रोजगार व उद्योजकता-मार्गदर्शन अधिकारी, गट-ब | S-१५ : ४१८००-१३२३०० अधिक महागाई भत्ता व नियमाप्रमाणे देय भत्ते. | सहायक संचालक कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता,गट-अ व त्यापुढील पदे | महाराष्ट्रात कोठेही |
| २६ | उद्योग अधिकारी,तांत्रिक, गट-ब | S-१५ : ४१८००-१३२३०० अधिक महागाई भत्ता व नियमाप्रमाणे देय भत्ते. | उद्योग उपसंचालक व त्यापुढील पदे | महाराष्ट्रात कोठेही |
| २७ | सहायक प्रकल्प अधिकारी/सांख्यिकी अधिकारी/प्रशासकीय अधिकारी/ संशोधन अधिकारी / गृहप्रमुख /प्रबंधक, गट-ब | S-१५ : ४१८००-१३२३०० अधिक महागाई भत्ता व नियमाप्रमाणे देय भत्ते. | प्रकल्प अधिकारी (एकात्मिक अदिवासी विकास प्रकल्प) (श्रेणी दोन)/सहायक आयुक्त | महाराष्ट्रात कोठेही |
| २८ | नायब तहसिलदार, गट-ब | S-१४ : ३८६००-१२२८००अधिक महागाई भत्ता व नियमाप्रमाणे देय भत्ते. | तहसिलदार,गट-अ व त्यापुढील पदे | महाराष्ट्रात कोठेही |

**१.२** शासनाच्या मागणीनुसार भरावयाच्या पदांचा तपशील, पदसंख्या, आरक्षण, अर्हता, इत्यादी बाबी जाहिरात / अधिसूचनेद्वारे उमेदवारांना उपलब्ध करून देण्यात येतील.

**२. परीक्षेचे टप्पे:-**

**२.१** प्रस्तुत परीक्षा एकूण तीन टप्प्यात घेण्यात येते:-

| **(एक)** पूर्व परीक्षा | मुख्य परीक्षा | |
|---|---|---|
| | **(दोन)** लेखी परीक्षा | **(तीन)** मुलाखत |
| ४०० गुण | ८०० गुण | १०० गुण |

**२.२** पूर्व परीक्षा ही मुख्य परीक्षेसाठी उमेदवारांची संख्या विहित मर्यादेत सिमित करण्यासाठी घेण्यात येते. याकरीता पूर्व परीक्षेसाठी आयोगाने विहित केलेल्या किमान सीमारेषा किंवा त्यापेक्षा जास्त गुण मिळविणा-या उमेदवारांस मुख्य परीक्षेच्या प्रवेशासाठी पात्र समजण्यात येते.

**२.३** पूर्व परीक्षेचे गुण अंतिम निवडीच्या वेळी विचारात घेतले जात नाहीत. तसेच, पूर्व परीक्षेचे गुण उमेदवारांना कळविले जात नाहीत.

**२.४** मुख्य परीक्षेकरिता आयोगाने विहित केलेल्या किमान सीमारेषा किंवा त्यापेक्षा जास्त गुण मिळविणारे उमेदवार मुलाखतीसाठी पात्र ठरतात.

**२.५** जाहिरात/अधिसूचनेतील तरतुदीनुसार विहित अटींची पूर्तता करणा-या व मुलाखतीच्या वेळी सर्व मूळ कागदपत्रे सादर करणा-या उमेदवारांची मुलाखत घेण्यात येते.

**३.पात्रता:-**

**३.१** भारतीय नागरीकत्व

**३.२ वयोमर्यादा:-**

| **वयोमर्यादा गणण्याचा दिनांक** | **किमान** | **कमाल** | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | **प्राविण्यप्राप्त खेळाडू** | | **माजी सैनिक, आणिबाणी व अल्पसेवा राजादिष्ट अधिकारी** | | **दिव्यांग** | **अनाथ** | **इतर** | |
| | | **अमागास** | **मागासवर्गीय** | **अमागास** | **मागासवर्गीय** | | | **अमागास** | **मागासवर्गीय** |
| जाहिरातीमध्ये नमूद दिनांक | १९ | ४३ | ४३ | ४३ | ४८ | ४५ | ४३ | ३८ | ४३ |

**३.३** विहित वयोमर्यादा इतर कोणत्याही बाबतीत शिथिल करण्यात येणार नाही.

**३.४ शैक्षणिक अर्हता:-**

**३.४.१** खाली नमूद पदे वगळून इतर पदांसाठी मान्यताप्राप्त विद्यापीठाची पदवी किंवा महाराष्ट्र शासनाने पदवीस समतुल्य म्हणून मान्य केलेली विहित अर्हता.

| अ.क्र. | पदाचे नाव | शैक्षणिक अर्हता |
|---|---|---|
| **३.४.२** | सहायक संचालक, महाराष्ट्र वित्त व लेखा सेवा, गट -अ | (१) सांविधिक विदयापीठाची, किमान ५५ टक्क्यांसह वाणिज्य शाखेची स्नातक पदवी, किंवा<br>(२)इन्स्टिटयुट ऑफ चार्टर्ड अकांऊटस आर्फ इंडिया यांनी घेतलेली सनदी लेखापालाची अंतिम परीक्षा उत्तीर्ण किंवा<br>(३)इन्स्टिटयुट ऑफ कॉस्ट ॲण्ड वर्क्स अकांऊटस यांनी आयोजित केलेली परिव्यय लेखाशास्त्राची अंतिम परीक्षा उत्तीर्ण किंवा<br>(४)सांविधिक विदयापीठाची वाणिज्य मधील पदव्युतर पदवी, किंवा<br>(५) अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषदेच्या मान्यताप्राप्त संस्थेमधून वित्त व्यवसाय प्रशासन या विशेषज्ञतेसह पदवी (एम.बी.ए). |
| **३.४.३** | लेखाधिकारी, महाराष्ट्र वित्त व लेखा सेवा, गट-ब | |
| **३.४.४** | सहायक प्रादेशिक परिवहन अधिकारी, गट-ब | (१) भौतिकशास्त्र व गणित या विषयांसह विज्ञान अथवा<br>(२) अभियांत्रिकी शाखेतील पदवी |
| **३.४.५** | उद्योग उप संचालक (तांत्रिक), गट-अ | (१)सांविधिक विदयापीठाची अभियांत्रिकी मधील (स्थापत्य अभियांत्रिकी तसेच स्थापत्य अभियांत्रिकी मधील विषयांच्या गटांशी संलग्न असलेल्या वास्तुविद्या, नगररचना इत्यादी विषयांव्यतिरिक्त) किंवा तंत्रज्ञानामधील पदवी किंवा<br>(२) विज्ञान शाखेतील सांविधिक विद्यापीठाची पदवी. |
| **३.४.६** | उद्योग अधिकारी (तांत्रिक), गट-ब | |

**३.४.७** मराठी भाषेचे ज्ञान आवश्यक.

**३.४.८** पदवीच्या शेवटच्या वर्षाच्या परीक्षेस बसलेले उमेदवार पूर्व परीक्षेच्या प्रवेशासाठी पात्र असतील. परंतु मुख्य परीक्षेकरीता अर्हताप्राप्त ठरल्यास मुख्य परीक्षेच्या प्रवेशासाठी विहित पद्धतीने आवश्यक माहिती व परीक्षा शुल्क सादर करण्याच्या अंतिम दिनांकापर्यंत पदवी परीक्षा उत्तीर्ण होणे अनिवार्य राहील.

**३.४.९** अंतर्वासिता किंवा कार्यशाळेतील प्रत्यक्ष कामाचा अनुभव आवश्यक असेल अशा पदवी धारकाने शैक्षणिक अर्हतेबाबतची अट मुख्य परीक्षेची माहिती/अर्ज स्वीकारण्याच्या विहित दिनांकापर्यंत पूर्ण केली असली पाहिजे.

**३.५ शारीरिक अर्हता:-**

**३.५.१** खाली नमूद पदावरील नियुक्तीसाठी वर नमूद केलेल्या अर्हतेसोबत उमेदवाराची शारीरिक अर्हता त्यांच्या नावासमोर दर्शविल्याप्रमाणे असणे आवश्यक आहे:-

| अ.क्र. | पदाचे नाव | पुरुष उमेदवारांकरीता | महिला उमेदवारांकरीता |
|---|---|---|---|
| १. | पोलीस उप अधीक्षक / सहायक पोलीस आयुक्त, गट अ | उंची-१६५ सें. मी. (अनवाणी) (कमीत कमी)<br>छाती-न फुगविता ८४ से.मी.<br>फुगविण्याची क्षमता-किमान ५ से.मी. आवश्यक | उंची - १५७ सें.मी. (अनवाणी) (कमीत कमी) |
| २. | अधीक्षक, राज्य उत्पादनशुल्क, गट-अ | उंची-१६५ सें. मी. (अनवाणी)(कमीत कमी)<br>छाती - न फुगविता ७९ से.मी.<br>फुगविण्याची क्षमता- किमान ५ से.मी. आवश्यक | उंची-१५५ सें.मी. (अनवाणी) (कमीत कमी) |
| ३. | उपअधीक्षक राज्य उत्पादनशुल्क, गट-ब | | |
| ४. | सहायक प्रादेशिक परिवहन अधिकारी, गट-ब | उंची - १६३ सें. मी. (अनवाणी) (कमीत कमी)<br>छाती - न फुगविता ७९ से.मी. (कमीत कमी)<br>फुगविण्याची क्षमता किमान ५से.मी. आवश्यक<br>चष्म्यासह अथवा चष्म्याशिवाय चांगली दृष्टी आणि रंगांधळेपणा नसावा. | उंची-१६३ सें.मी. (अनवाणी) (कमीत कमी)<br>चष्म्यासह अथवा चष्म्याशिवाय चांगली दृष्टी आणि रंगांधळेपणा नसावा. |

**३.५.२** नियुक्तीसाठी शिफारस झालेल्या उमेदवारांची नियुक्ती करण्यापूर्वी त्यांची शारीरिक मोजमापे शासनाच्या संबंधित विभागामार्फत सक्षम प्राधिका-याकडून तपासून घेण्यात येतील.

**३.५.३** संबंधित पदासाठी आवश्यक शारीरिक मोजमापे न भरल्यास उमेदवार सदर पदावर नियुक्तीसाठी अपात्र ठरेल. शारीरिक मोजमापाच्या तपासणीमध्ये अपात्र ठरणा-या उमेदवाराची अन्य पदासाठी शिफारस केली जाणार नाही.

४. **शुल्क (फी):-**

**४.१** प्रस्तुत परीक्षेकरीता आयोगाकडून आकारण्यात येणारे शुल्क खालीलप्रमाणे आहे:-

| अ.क्र. | परीक्षेचे नांव | परीक्षा शुल्क | |
|---|---|---|---|
| | | अमागास | मागासवर्गीय व अनाथ |
| (१) | राज्यसेवा पूर्व परीक्षा | ₹ ५२४/- | ₹ ३२४/- |
| (२) | राज्यसेवा मुख्य परीक्षा | ₹ ५२४/- | ₹ ३२४/- |

**४.२** विमुक्त जाती (अ), भटक्या जमाती (ब), विशेष मागास प्रवर्ग, भटक्या जमाती (क), भटक्या जमाती (ड), इतर मागास वर्ग तसेच सामाजिक व शैक्षणिकदृष्ट्या मागास प्रवर्ग या प्रवर्गातील उन्नत व प्रगत गटात (क्रिमी लेयर) मोडणाऱ्या उमेदवारांना आरक्षणाचा व वयोमर्यादेचा फायदा देय नसल्याने त्यांनी अमागास उमेदवारांप्रमाणे परीक्षा शुल्क भरणे आवश्यक आहे.

**४.३** उन्नत व प्रगत गटासंदर्भातील (क्रिमी लेयर) उत्पन्नाची मर्यादा तसेच अन्य तद्अनुषंगिक बाबी शासनाने वेळोवेळी जारी केलेल्या आदेशानुसार राहतील.

**५. पूर्व परीक्षा: -**

**५.१ परीक्षा योजना:-**

**५.१.१ परीक्षेचे टप्पे:- एक लेखी परीक्षा एकूण ४०० गुण**

**५.१.२ प्रश्नपुस्तिका- दोन (अनिवार्य)**

**५.१.३ प्रश्नपुस्तिकेचे स्वरुप:- खाली नमूद केल्याप्रमाणे दोन अनिवार्य प्रश्नपुस्तिका असतील:-**

| पेपर क्रमांक | संकेतांक | प्रश्नांची संख्या | गुण | दर्जा | माध्यम | परीक्षेचा कालावधी | प्रश्नपुस्तिकेचे स्वरुप |
|---|---|---|---|---|---|---|---|
| **पेपर १** | ०३५ | १०० | २०० | पदवी | मराठी व इंग्रजी | **दोन तास** | वस्तुनिष्ठ बहुपर्यायी |
| **पेपर २** | ०३६ | ८० | २०० | अभ्यासक्रमातील मुद्द्यांनुसार<br>मुद्दा क्रमांक (१) ते (५):- पदवी<br>मुद्दा क्रमांक (६):- १० वी<br>मुद्दा क्रमांक (७):-१०वी/१२वी | | **दोन तास** | |

**५.१.४ अभ्यासक्रम-**:सविस्तर अभ्यासक्रम आयोगाच्या संकेतस्थळावरील 'स्पर्धा परीक्षा' अंतर्गत 'अभ्यासक्रम' या सदराखाली उपलब्ध आहे.

**५.१.५** राज्य सेवा पूर्व परीक्षांच्या मुल्यांकनाकरीता उमेदवारांनी दोन्ही पेपर्सकरीता उपस्थित राहणे अनिवार्य आहे.

**५.२ परीक्षा केंद्र: -**

**५ .२ .१** खालील ठिकाणी सदर परीक्षा घेण्यात येईल:-

| केंद्र | संकेतांक |
|---|---|
| अहमदनगर | ११ |
| अकोला | १२ |
| अलिबाग | १३ |
| अमरावती | १४ |
| औरंगाबाद | १५ |
| बीड | १६ |
| भंडारा | १७ |
| बुलढाणा | १८ |
| चंद्रपूर | १९ |
| धुळे | २० |
| गडचिरोली | २१ |
| गोंदिया | २२ |
| हिंगोली | २३ |

| केंद्र | संकेतांक |
|---|---|
| जळगाव | २४ |
| जालना | २५ |
| कोल्हापूर | २६ |
| कुडाळ | २७ |
| लातूर | २८ |
| मुंबई (मध्य) | ३० |
| मुंबई (पश्चिम) | ३१ |
| नागपूर | ३२ |
| नांदेड | ३३ |
| नंदुरबार | ३४ |
| नाशिक | ३५ |
| उस्मानाबाद | ३६ |
| परभणी | ३७ |

| केंद्र | संकेतांक |
|---|---|
| पुणे | ३८ |
| रत्नागिरी | ३९ |
| सांगली | ४० |
| सातारा | ४१ |
| सोलापूर | ४२ |
| ठाणे | ४३ |
| वर्धा | ४४ |
| वाशिम | ४५ |
| यवतमाळ | ४६ |
| पालघर | ४७ |
| नवी मुंबई | ४८ |

**५.२.२** उपरोक्त जिल्हा केंद्रांमधून कोणतेही एक केंद्र ऑनलाईन पद्धतीने अर्ज सादर करताना निवडणे आवश्यक आहे.

**५.२.३** उपरोक्त जिल्हा केंद्रांमध्ये आवश्यकतेनुसार वेळोवेळी वाढ अथवा बदल होऊ शकतात.

**५.२.४** विहित पध्दतीने ऑनलाईन माहिती सादर करताना उमेदवारांने निवडलेले जिल्हाकेंद्र व उपलब्धतेनुसार जिल्हा केंद्रावरील विविध परीक्षा उपकेंद्रावर पात्र उमेदवारांना प्रवेश देण्यात येईल.

**५.२.५** एखादे जिल्हा केंद्र कार्यान्वित होऊ शकले नाही अथवा एखाद्या जिल्हा केंद्रांवर उमेदवारांना प्रवेश देण्याची क्षमता ओलांडली गेली_तर ते जिल्हाकेंद्र निवडलेल्या उमेदवारांची बैठक व्यवस्था जवळच्या दुस-या जिल्हा केंद्रावर करण्यात येईल.

**५.२.६** एकदा निवडलेल्या जिल्हा केंद्रामध्ये अथवा आयोगाने निश्चित केलेल्या परीक्षा उपकेंद्रामध्ये बदल करण्याची विनंती कोणत्याही कारणास्तव मान्य करण्यात येणार नाही.

**५.२.७** वरीलप्रमाणे जिल्हा केंद्रनिवडीची प्रक्रिया पूर्ण न केल्यास उमेदवाराने अर्जामध्ये दिलेल्या पत्रव्यवहाराच्या पत्त्यामधील नमूद जिल्हाकेंद्रावर किंवा नजिकच्या जिल्हाकेंद्रावर प्रवेश देण्यात येईल. याबाबत आयोगाचे त्या त्या वेळचे धोरण व आयोगाचा निर्णय अंतिम मानण्यात येईल.

**५.३ पूर्व परीक्षेचा निकाल:-**

**५.३.१** वस्तुनिष्ठ स्वरुपाच्या उत्तरपत्रिकांचे मूल्यांकन करताना उत्तरपत्रिकेत नमुद केलेल्या योग्य उत्तरांनाच गुण दिले जातील. तसेच प्रस्तुत परीक्षेच्या प्रश्नपुस्तिका क्रमांक २ मधील अभ्यासक्रमातील "Decision Making & Problem Solving" हा घटक वगळून दोन्ही प्रश्नपुस्तिकेमधील उर्वरित प्रश्नाच्या प्रत्येक तीन चुकीच्या उत्तरामागे एका प्रश्नाचे गुण एकूण गुणांमधून वजा करण्यात येतील.

**५.३.२** प्रश्नपुस्तिका क्रमांक २ मधील अभ्यासक्रमातील "Decision Making & Problem Solving" या घटकाच्या चुकीच्या उत्तरासाठी गुण वजा करण्यात येणार नाहीत.

**५.३.३** उमेदवाराने एखाद्या प्रश्नाची एकापेक्षा जास्त उत्तरे दिली असल्यास, सदर प्रश्नाचे उत्तर चुकले असल्याचे समजून वरील परिच्छेद क्रमांक ५.३.१ मधील तरतुदीनुसार गुण वजा करण्यात येतील.

**५.३.४** भरावयाच्या एकूण पदांच्या सुमारे १२ पट उमेदवार मुख्य परीक्षेच्या प्रवेशासाठी पात्र होतील, अशा रीतीने प्रथम टप्प्यात गुणांची सीमारेषा (Cut Off Line) निश्चित करण्यात येईल. तद्नंतर, दुस-या टप्प्यात प्रत्येक प्रवर्गातील पदांसाठी १२ पट उमेदवार उपलब्ध होण्याची निश्चिती करण्यासाठी जरुरीप्रमाणे सीमारेषा खाली ओढली जाईल. तथापि, अशा पध्दतीने मुख्य परीक्षेच्या प्रवेशासाठी दुस-या टप्प्यात पात्र ठरलेले अतिरिक्त उमेदवार केवळ त्यांच्या राखीव प्रवर्गासाठीच्या पदावरच निवडीसाठी पात्र असतील.

**५.३.५** केवळ सर्वसाधारण (अमागास) उमेदवारांच्या सीमारेषेच्या आधारे मुख्य परीक्षेच्या प्रवेशासाठी पात्र ठरलेल्या उमेदवारांची उमेदवारी अंतिम निवडीच्या वेळी सर्वसाधारण (अमागास) पदासाठी विचारात घेतली जाईल. सर्वसाधारण (अमागास) उमेदवारांसाठी असलेली सीमारेषा शिथिल करुन मुख्य परीक्षेच्या प्रवेशासाठी पात्र ठरलेले उमेदवार अंतिम शिफारशीच्या वेळी फक्त संबंधित आरक्षित पदासाठी पात्र ठरतील.

**५.३.६** प्रत्येक प्रवर्ग/उपप्रवर्गासाठी आयोगाने निश्चित केलेल्या सीमारेषा किंवा त्यापेक्षा जास्त गुण मिळविणा-या उमेदवारांना त्यांनी पूर्व परीक्षेच्या अर्जामध्ये दिलेल्या माहितीच्या आधारे, ते विहित अटींची पूर्तता करतात असे समजून निव्वळ तात्पुरत्या स्वरूपात मुख्य परीक्षेच्या प्रवेशासाठी पात्र समजण्यात येईल.

**५.३.७** अशा रितीने मुख्य परीक्षेच्या प्रवेशासाठी पात्र ठरलेल्या उमेदवारांची यादी आयोगाच्या संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात येईल.

**५.३.८** मुख्य परीक्षेच्या प्रवेशासाठी पात्र ठरलेल्या उमेदवारांचा निकाल व निकाल जाहीर झाल्याची घोषणा आयोगाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात येईल. तसेच, मुख्य परीक्षेच्या प्रवेशासाठी पात्र ठरलेल्या प्रत्येक उमेदवाराला आयोगाकडील नोंदणीकृत मोबाईल क्रमांकावर एसएमएसद्वारे वैयक्तिकरीत्या कळविण्यात येईल. तथापि, वैयक्तिकरित्या एसएमएसद्वारे कळविण्याची सुविधा अतिरिक्त सुविधा असून आयोगाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आलेला निकाल हाच अधिकृत मानण्यात येईल. तसेच, फक्त संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आलेला निकाल कोणत्याही अभिवेदन अथवा दाव्यांकरीता ग्राह्य धरण्यात येईल.

**५.३.९** पूर्व परीक्षा ही मुख्य परीक्षेच्या प्रवेशाकरीता उमेदवारांची संख्या मर्यादित करण्याच्या दृष्टिने घेण्यात येणारी चाळणी परीक्षा असल्याने मुख्य परीक्षेच्या प्रवेशासाठी पात्र न ठरलेल्या उमेदवारांच्या उत्तरपत्रिकांची फेरतपासणी केली जात नाही अथवा यासंदर्भातील कोणत्याही प्रकारच्या अभिवेदनावर कार्यवाही केली जात नाही.

**६. मुख्य परीक्षा**

**६.१ परीक्षेस प्रवेश:-**

**६.१.१** पूर्व परीक्षेकरीता आयोगाने विहित केलेल्या मर्यादेनुसार अर्हताप्राप्त होणा-या आणि आवश्यक शैक्षणिक अर्हता व अन्य अटींची पूर्तता करणा-या उमेदवारांस मुख्य परीक्षेच्या प्रवेशासाठी पात्र समजण्यात येईल.

**६.१.२** मुख्य परीक्षेकरीता आयोगाच्या कार्यालयाकडून अधिसूचना निर्गमित झाल्यानंतर आयोगाच्या ऑनलाईन अर्ज प्रणालीच्या संकेतस्थळाद्वारे मुख्य परीक्षेच्या प्रवेशासाठी पात्र उमेदवारांना त्यांच्या प्रोफाईलद्वारे अर्ज करता येईल. त्यावेळी मुख्य परीक्षेच्या प्रवेशासाठी आयोगाने विहित केलेल्या ऑनलाईन पद्धतीने जिल्हा केंद्र निवडून परीक्षा-शुल्क विहित मुदतीत सादर करणे आवश्यक राहील. त्याशिवाय उमेदवारास मुख्य परीक्षेच्या प्रवेशासाठी पात्र समजण्यात येणार नाही.

**६.१.३** प्रस्तुत पदाच्या पूर्व परीक्षेसाठी अर्ज करतेवेळी आवश्यक ती शैक्षणिक अर्हता नसल्यास व मुख्य परीक्षेकरीता आवश्यक माहिती व परीक्षा शुल्क सादर करण्याच्या अंतिम दिनांकापर्यंत शैक्षणिक अर्हता प्राप्त केल्यास, अशा उमेदवाराला शैक्षणिक अर्हता प्राप्त केल्याचा दिनांक नमूद करता येईल. इतर कोणत्याही दाव्यामध्ये बदल करता येणार नाही.

**६.२. परीक्षा योजना:-**

**६.२.१ परीक्षेचे टप्पे:- दोन (१) लेखी परीक्षा ८०० गुण (२) मुलाखत १०० गुण.**

**६.२.२ एकूण प्रश्नपुस्तिका:-६.**

**६.२.३ प्रश्नपुस्तिकेचे स्वरुप:-** प्रस्तुत लेखी परीक्षेमध्ये खाली नमुद केल्याप्रमाणे सहा अनिवार्य प्रश्नपुस्तिका असतील:-

| पेपर क्रमांक | संकेताक | विषय | | प्रश्न संख्या | गुण | दर्जा | माध्यम | एकूण कालावधी | प्रश्नपुस्तिकेचे स्वरुप |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | ०४२ | भाषा पेपर-१ | मराठी | -- | ५० | उच्च माध्यमिक शालान्त | मराठी | ३ तास | पारंपरिक/वर्णनात्मक |
| | | | इंग्रजी | -- | ५० | | इंग्रजी | | |
| २ | ०४३ | भाषा पेपर-२ | मराठी | ५० | ५० | पदवी | मराठी | १ तास | वस्तुनिष्ठ बहुपर्यायी |
| | | | इंग्रजी | ५० | ५० | | इंग्रजी | | |
| ३ | ०३१ | सामान्य अध्ययन-१ | | १५० | १५० | पदवी | मराठी व इंग्रजी | २ तास | वस्तुनिष्ठ बहुपर्यायी |
| ४ | ०३२ | सामान्य अध्ययन-२ | | १५० | १५० | पदवी | मराठी व इंग्रजी | २ तास | वस्तुनिष्ठ बहुपर्यायी |
| ५ | ०३३ | सामान्य अध्ययन-३ | | १५० | १५० | पदवी | मराठी व इंग्रजी | २ तास | वस्तुनिष्ठ बहुपर्यायी |
| ६ | ०३४ | सामान्य अध्ययन-४ | | १५० | १५० | पदवी | मराठी व इंग्रजी | २ तास | वस्तुनिष्ठ बहुपर्यायी |

**६.२.४ अभ्यासक्रम:-** सविस्तर अभ्यासक्रम आयोगाच्या संकेतस्थळावरील 'स्पर्धा परीक्षा' अंतर्गत अभ्यासक्रम या सदराखाली उपलब्ध आहे.

**६.२.५** पारंपरिक स्वरुपाच्या परीक्षेच्या वेळी आयोगाकडून उमेदवारांना पुरविण्यात येणा-या उत्तरपुस्तिकेमध्ये दिलेल्या पृष्ठांवरच उत्तरे नमूद करणे आवश्यक आहे.

**६.२.६** मुख्य उत्तरपुस्तिकेव्यतिरिक्त उमेदवारांना कोणत्याही परिस्थितीत पुरवणी उत्तरपुस्तिकेचा पुरवठा करण्यात येणार नाही.

**६.२.७** भाषा पेपर क्रमांक १ मधील दोन्ही भागांकरीता (मराठी व इंग्रजी) एकच संयुक्त प्रश्नपुस्तिका राहील.

**६.२.८** भाषा पेपर क्रमांक २ मधील दोन्हीं भागांकरीता (मराठी व इंग्रजी) एकच संयुक्त प्रश्नपुस्तिका राहील. त्यामध्ये खालीलप्रमाणे दोन विभाग राहतील:-

(१) मराठी भाषेचे प्रश्न क्रमांक १ ते ५० आणि

(२) इंग्रजी भाषेचे प्रश्न क्रमांक ५१ ते १००.

**६.२.९** पारंपरिक/वर्णनात्मक स्वरुपाच्या पेपर क्रमांक १ (मराठी व इंग्रजी) करीता भाग-१ (मराठी) व भाग-२ (इंग्रजी) साठी दोन स्वतंत्र उत्तरपुस्तिका एकाच वेळी पुरविण्यात येतील. मराठी भाषेसाठी तसेच इंग्रजी भाषेसाठी स्वतंत्र उत्तरपुस्तिकांचा वापर करणे अनिवार्य आहे.

**६.२.१०** भाषा पेपर क्रमांक १ मधील भाग-१ (मराठी) च्या उत्तरपुस्तिकेमध्ये भाग-२ (इंग्रजी) चे प्रश्न सोडविल्यास किंवा भाग-२ (इंग्रजी) च्या उत्तरपुस्तिकेमध्ये भाग-१ (मराठी) चे प्रश्न सोडविल्यास, अशी उत्तरे तपासली जाणार नाहीत व ती दुर्लक्षित केली जातील.

**६.२.११** पारंपरिक स्वरुपाच्या उत्तरपुस्तिकेमध्ये उमेदवाराने प्रश्नांचे उपप्रश्न सोडविताना (अ, ब, क, ड किंवा १, २, ३, ४) सलगरीत्या सोडवावे. एक उपप्रश्न एका पानावर, तर दुसरा उपप्रश्न काही पृष्ठे सोडून अथवा अन्य पृष्ठावर सोडविल्यास तो उपप्रश्न दुर्लक्षित करण्यात येईल.

**६.२.१२** भाषा पेपर क्रमांक २ (वस्तुनिष्ठ बहुपर्यायी) मधील दोन्ही भागांकरीता एकच सामाईक उत्तरपत्रिका राहील.

**६.३ परीक्षा केंद्र:-**

**६.३.१** खालील चार ठिकाणी सदर मुख्य परीक्षा घेण्यात येईल:-

| केंद्र | केंद्राचा सांकेतांक |
|---|---|
| औरंगाबाद | **१५** |
| मुंबई | **३०** |

| केंद्र | केंद्राचा सांकेतांक |
|---|---|
| नागपूर | **३२** |
| पुणे | **३८** |

**६.३.२** उपरोक्त जिल्हा केंद्रांमधून कोणतेही एक जिल्हा केंद्र ऑनलाईन पद्धतीने मुख्य परीक्षेकरीता माहिती सादर करताना निवडणे आवश्यक आहे.

**६.३.३** उपरोक्त जिल्हा केंद्रांमध्ये आवश्यकतेनुसार वेळोवेळी वाढ अथवा बदल होऊ शकतात.

**६.३.४** विहित पद्धतीने ऑनलाईन माहिती सादर करताना उमेदवाराने निवडलेले जिल्हाकेंद्र व उपलब्धतेनुसार जिल्हा केंद्रावरील विविध परीक्षा उपकेंद्रावर पात्र उमेदवारांना प्रवेश देण्यात येईल.

**६.३.५** एखादे जिल्हा केंद्र कार्यान्वित होऊ शकले नाही अथवा एखाद्या जिल्हा केंद्रांवर उमेदवारांना प्रवेश देण्याची क्षमता ओलांडली गेली तर ते जिल्हाकेंद्र निवडलेल्या उमेदवारांची बैठक व्यवस्था जवळच्या दुस-या जिल्हा केंद्रावर करण्यात येईल.

**६.३.६** एकदा निवडलेल्या जिल्हा केंद्रामध्ये अथवा आयोगाने निश्चित केलेल्या परीक्षा उपकेद्रांमध्ये बदल करण्याची विनंती कोणत्याही कारणास्तव मान्य करण्यात येणार नाही.

**६.३.७** वरीलप्रमाणे जिल्हा केंद्रनिवडीची प्रक्रिया पूर्ण न केल्यास उमेदवाराने अर्जामध्ये दिलेल्या पत्रव्यवहाराच्या पत्त्यामधील नमूद जिल्हाकेंद्रावर किंवा नजिकच्या जिल्हाकेंद्रावर प्रवेश देण्यात येईल. याबाबत आयोगाचे त्या त्या वेळचे धोरण व आयोगाचा निर्णय अंतिम मानण्यात येईल.

**६.४ लेखी परीक्षेचा निकाल:-**

**६.४.१** वस्तुनिष्ठ स्वरुपाच्या उत्तरपत्रिकांचे मुल्यांकन करताना उत्तरपत्रिकेत नमुद केलेल्या योग्य उत्तरांनाच गुण दिले जातील. तसेच प्रत्येक तीन चुकीच्या उत्तरामागे एका प्रश्नाचे गुण एकूण गुणांमधून वजा करण्यात येतील.

**६.४.२** उमेदवाराने एखाद्या प्रश्नाची एकापेक्षा जास्त उत्तरे दिली असल्यास सदर प्रश्नाचे उत्तर चुकले असल्याचे समजून वरील परिच्छेद क्रमांक ६.४.१ मधील तरतूदीनुसार गुण वजा करण्यात येतील.

**६.४.३** भरावयाच्या एकूण पदांपैकी प्रत्येक प्रवर्ग/उपप्रवर्गासाठी सुमारे ३ पट उमेदवार मुलाखतीकरीता उपलब्ध होतील, अशा रीतीने सर्व पेपरच्या एकत्रित गुणांच्या आधारे गुणांची किमान सीमारेषा (Cut Off Line) निश्चित करण्यात येईल. सदर सीमारेषा सर्व उमेदवारांसाठी एकच किंवा प्रत्येक सामाजिक प्रवर्ग/उपप्रवर्गासाठी तसेच महिला, दिव्यांग, खेळाडू, अनाथ इत्यादींसाठी वेगवेगळी असेल.

**६.४.४** प्रत्येक प्रवर्ग/उपप्रवर्गासाठी आयोगाने निश्चित केलेल्या सीमारेषा किंवा त्यापेक्षा जास्त गुण मिळविणाऱ्या उमेदवारांना त्यांनी अर्जामध्ये दिलेल्या माहितीच्या आधारे, ते विहित अटींची पूर्तता करतात, असे समजून निव्वळ तात्पुरत्या स्वरूपात मुलाखतीसाठी पात्र समजण्यात येईल.

**६.४.५** प्रस्तुत लेखी परीक्षेमधून मुलाखतीसाठी अर्हताप्राप्त होण्याकरीता शतमत (Percentile) पध्दत लागू आहे. प्रस्तुत परीक्षेमध्ये सर्वाधिक गुण मिळविणा-या उमेदवाराच्या एकूण गुणांच्या तुलनेत खालीलप्रमाणे किमान शतमत गुण प्राप्त करणारे उमेदवार मुलाखतीसाठी विचार करण्यासाठी पात्र असतील:-

(१) अमागास - किमान ३५ शतमत

(२) मागासवर्गीय - किमान ३० शतमत

(३) दिव्यांग - किमान २० शतमत

(४) अत्युच्च गुणवत्ताधारक पात्र खेळाडू - किमान २० शतमत

**६.४.६** दिव्यांग अथवा अनाथ अथवा अत्युच्च गुणवत्ताधारक पात्र खेळाडू या प्रवर्गाच्या किमान सीमा रेषेच्या आधारे मुलाखतीसाठी पात्र ठरणा-या उमेदवारास कोणतीही एकच सवलत घेता येईल.

**६.४.७** मुलाखतीसाठी पात्र ठरलेल्या प्रत्येक उमेदवाराला ई-मेलद्वारे अथवा / व मोबाईल क्रमांकावर एसएमएसद्वारे वैयक्तिकरीत्या कळविण्यात येईल. तसेच लेखी परीक्षेचा निकाल व निकाल जाहीर झाल्याची घोषणा आयोगाच्या संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात येईल. तथापि, वैयक्तिकरित्या ईमेल अथवा एसएमएसद्वारे कळविण्याची सुविधा ही अतिरिक्त सुविधा असून आयोगाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आलेला निकाल हाच अधिकृत मानण्यात येईल. तसेच, कोणत्याही अभिवेदन अथवा दाव्यांकरीता ग्राह्य धरण्यात येईल.

**६.४.८** अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटक तसेच उन्नत व प्रगत गटात मोडत नसल्याचे प्रमाणपत्र (नॉन-क्रिमी लेयर) असलेल्या विमुक्त जाती (अ), भटक्या जमाती (ब), विशेष मागास प्रवर्ग, भटक्या जमाती (क), भटक्या जमाती (ड), इतर मागास वर्ग व सामाजिक व शैक्षणिकदृष्ट्या माग़ास प्रवर्ग या प्रवर्गातील उमेदवार तसेच दिव्यांग, महिला व अनाथ उमेदवार लेखी परीक्षेत केवळ त्यांच्यासाठी विहित केलेल्या निम्न सीमारेषेनुसार अर्हताप्राप्त झाल्यास अंतिम शिफारशींच्या वेळी त्यांची उमेदवारी सर्वसाधारण (अमागास)पदासाठी विचारात घेतली जाणार नाही व केवळ त्या त्या संबंधित प्रवर्गासाठी विचारात घेतली जाईल.

**६.५ पदांचा पसंतीक्रम:-**

मुख्य परीक्षेच्या निकालाच्या आधारे मुलाखतीसाठी अर्हताप्राप्त ठरलेल्या व जाहिरात / अधिसूचनेत विहित केलेल्या अर्हता, अटी व शर्ती पूर्ण करीत असलेल्या उमेदवारांना संबंधित परीक्षेमधून भरावयाच्या पदांचा पसंतीक्रम ऑनलाईन पद्धतीने देणे आवश्यक राहील. अशा प्रकारे पसंतीक्रम नमूद करण्याची फक्त एकच संधी उमेदवारांस खालील अटींवर देण्यात येईल:-

**(१)** पसंतीक्रम ऑनलाईन पद्धतीने आयोगाकडून निश्चित करण्यात आलेल्या कालावधीतच सादर करणे आवश्यक राहील.

**(२)** पसंतीक्रम आयोगास सादर केल्यानंतर पदाच्या पसंतीक्रमात बदल करण्यासंबंधीच्या विनंतीचा कोणत्याही परिस्थितीत विचार केला जाणार नाही.

**(३)** आयोगाकडून निश्चित करण्यात आलेल्या कालावधीत ऑनलाईन पद्धतीने पसंतीक्रम सादर न केल्यास अधिसूचनेत नमूद केलेल्या पदक्रमांकानुसारच त्यांचा पसंतीक्रम आहे, असे समजण्यात येईल व त्यात नंतर बदल करण्याची संधी देण्यात येणार नाही.

**(४)** संबंधित पदाकरीता विहित शारीरिक पात्रतेच्या व शैक्षणिक अर्हतेच्या अटी पूर्ण न करणा-या उमेदवारांनी संबंधित पदासाठी पसंतीक्रम नमूद करू नये.

**(५)** दिव्यांग उमेदवारांच्या बाबतीत शासन निर्णयान्वये दिव्यांग उमेदवारांना एखाद्या पदावर नियुक्तीसाठी अपात्र ठरविले असल्यास त्याचा संबंधित पदासाठी विचार केला जाणार नाही. याबाबतचा तपशील जाहिरात/अधिसूचनेमध्ये दिला जाईल.

**६.६ मुलाखत:-**

**६.६.१** विहित सीमांकन रेषेनुसार लेखी परीक्षेच्या निकालाच्या आधारे मुलाखतीसाठी पात्र उमेदवारांना मुलाखतीसाठी बोलविण्यात येईल. मुलाखत १०० गुणांची असेल.

**६.६.२** मुलाखतीसाठी पात्र ठरलेल्या उमेदवारांची पात्रता जाहिरात/अधिसूचनेतील अर्हता/अटी व शर्तीनुसार मूळ कागदपत्राच्या आधारे तपासली जाईल आणि अर्जातील दाव्यानुसार मूळ कागदपत्र सादर करणा-या उमेदवारांची मुलाखत घेतली जाईल.

**६.६.३** विहित कागदपत्रे सादर करू न शकणा-या उमेदवारांची उमेदवारी रद्द करण्यात येईल व त्याची मुलाखत घेतली जाणार नाही. तसेच त्याकरीता कोणतीही मुदतवाढ देण्यात येणार नाही.

**६.६.४** वरीलप्रमाणे लेखी परीक्षेच्या निकालाच्या आधारे मुलाखतीसाठी पात्र ठरणा-या उमेदवारांच्या मुलाखती आयोगाच्या कार्यक्रमानुसार तसेच आयोगाने निश्चित केलेल्या ठिकाणी व विहित वेळेस घेण्यात येतील.

**६.७ अंतिम निकाल:—**

लेखी परीक्षा आणि मुलाखतीमध्ये प्राप्त केलेल्या गुणांची एकत्रित बेरीज करुन गुणवत्ताक्रमानुसार यादी तयार करण्यात येईल. सदर गुणवत्ता यादीमधील समान गुण धारण करणा-या उमेदवारांचा प्राधान्यक्रम (Ranking) "**उमेदवारांना सर्वसाधारण सूचना**" मध्ये नमूद केलेल्या निकषानुसार किंवा कार्यानियमावलीतील तरतुदीनुसार ठरविण्यात येईल.

**६.८ शिफारस:-**

**६.८.१** "**उमेदवारांना सर्वसाधारण सूचना**" मध्ये नमूद केलेल्या कार्यपद्धतीनुसार उमेदवारांच्या शिफारसी शासनाच्या संबंधित विभागाकडे पाठविण्यात येतील.

**६.८.२** मुलाखत घेतलेल्या उमेदवारांना मुलाखतीनंतर त्यांची नियुक्तीसाठी शासनाकडे शिफारस करण्यात आलेली आहे किंवा नाही ते त्यांच्या प्रोफाईलद्वारे कळविण्यात येईल. तसेच, शिफारस झालेल्या उमेदवारांची नांवे आयोगाच्या संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात येतील.

**७.** प्रस्तुत परीक्षा योजना उमेदवारांना परीक्षेचे स्वरुप समजण्यास सुलभता व्हावी, या हेतूने प्रसिध्द करण्यात येत असून यामधील कोणतीही तरतूद प्रस्तुत परीक्षेची जाहिरात / अधिसूचना, संबंधित शासन निर्णय व आयोगाच्या कार्यनियमावली यांमधील तरतूदींशी विसंगत असल्यास प्रस्तुत परीक्षेची जाहिरात / अधिसूचना, संबंधित शासन निर्णय व आयोगाच्या कार्यनियमावलीतील तरतुदी ग्राह्य धरण्यात येतील.

************

दिनांक:-१५ जानेवारी, २०२०

उप सचिव, परीक्षा पूर्व
महाराष्ट्र लोकसेवा आयोग.